# मुरघासाविषयी शेतकऱ्यांच्या मनातील प्रश्न

सौ. संस्कृती संग्राम पाटील
विषय विशेषज्ञ (कृषि विद्या)
कृषि विज्ञान केंद्र, सांगली – II

नमस्कार शेतकरी मित्रांनो, पशुपालक नेहमीच काही प्रश्न विचारत असतात. आज आपण ते सविस्तरपणे बघुयात,

१) एका जनावराला किती मुरघास चारा खाऊ घालावा?
उत्तर: जनावरांना शरीरपोषणासाठी व दुग्धोउपादनासाठी खाद्याची गरज असते. ज्या आहारातून शरीरपोषणासाठी व दुग्धोउपादनासाठी आवश्यक अन्नद्रव्ये पाचक स्वरुपात मिळतात व भूक भागते त्या आहारास 'समतोल आहार' असे म्हणतात. सर्वसाधारणपणे गाय / म्हशीस वजन अंदाजे ४०० किलो धरल्यास,जनावरांना त्यांच्या वजनाच्या २ ते २.५ % वाळलेला चारा लागतोम्हणजेच ६-८ किलो वाळलेला चारा खायला दिला पाहिजे.व जनावरांना त्यांच्या वजनाच्या ४ ते ६ % हिरवा चारा लागतो. म्हणजेच २५ किलो हिरवा चारा व ५-६ किलो खुराक खाद्य आवश्यक असते. वरील खाद्य पारंपरिक पद्धतीने जनावरांचे संगोपन केल्यास लागते कारण हिरवा किंवा वाळलेल्या चाऱ्याची पाचकता ही ५०% असते.हेच खाद्य जर तुम्ही मुरघासच्या स्वरूपात दिले तर, चाऱ्याचे प्रमाण तुम्ही ५०% वर आणू शकता.म्हणजे १५ ते २० किलो मुरघास पूर्ण वाढ झालेल्या गाय, म्हैस, बैल यांस पुरेसा असतो.कारण मुरघास हा १००% unaerobic fermentaion झालेला चारा असतो म्हणजे याची पाचकता ९५ ते ९८% असते.मुरघासात ६५ % आद्रता व ३५% ड्राय मॅटर (शुष्क पदार्थ) असतात. मकेचा मुरघास वापरल्यास, जनावाऱ्याच्या खुराकाची मात्रा तुम्ही ५०% वर आणू शकता म्हणजे तुम्ही खुराक २.५ ते ३ किलोवर आणू शकता कारण ५० किलो मुरघासात ८ ते १० किलो चिकातील कणसे असतात.

२) सर्वात उत्तम मूरघास कोणता?
उत्तर: कोणत्याही चारा पिकामधे सर्वात श्रेष्ठ समजला जाणारा मूरघास म्हणजे मका चाऱ्याचा मूरघास. मका ही चिकावर असतांना, त्याचा मूरघास बनविल्यास अतिशय उत्तम मूरघास होतो. मूरघास बनविण्यासाठी आधुनिक मका व्हरायटी म्हणजे Advanta ७४०, ७५६, ९२९३ इत्यादी व्हरायटींचा उत्तम व भरपूर मूरघास तयार होतो. कारण या व्हरायटी जादा चारा उत्पादन देणाऱ्या व्हरायटी आहेत.

३) शेळ्या व बोकड यांसाठी कोणता मुरघास वापरावा?
उत्तर: शेळ्या व बोकड यांचे वजन वाढविण्यासाठी ज्वारी चा मुरघास सर्वोत्तम आहे. कुर्बानी बोकडाच्या त्वचेची शायनिंग तकाकी वाढविण्यासाठी मका + लसूण घास (६०:४०) मुरघास वापरावा.

४) बैल गाडा शर्यतींच्या बैलांसाठी कोणता मुरघास वापरावा?
उत्तर: शर्यतीचे बैल चपळ व काटक होण्यासाठी ज्वारीचा मुरघास सर्वोत्तम आहे.

५) गायी म्हशींच्या गाभण काळात कोणता मुरघास वापरावा?
उत्तर: गाय म्हैस व्याला नंतर ३ ते ४ महिन्यांनी दुधाचे प्रमाण कमी होते त्या दरम्यान गाय म्हैस उच्च प्रतीच्या कृत्रिम रेतनाने भरवून घ्यावी. गाभण राहिल्यास दुधाचे प्रमाण कमी होते गायीच्या तिसऱ्या महिन्यापासून सातव्या महिन्यापर्यंत व म्हशींच्या आठव्या महिन्या पर्यंत ज्वारी व ऊस वाढे मुरघास वापरावा म्हणजे तुमच्या चाऱ्याच्या खर्चात बचत होते. परंतु हे लक्षात ठेवा, की सर्वात उत्तम मूरघास म्हणजे मका चाऱ्याचा मूरघास. गाय म्हैस आटवल्यानंतर आठवा नववा महिन्यात मकेचा मुरघास वापरावा गाय म्हैस व पोटातील गर्भ यांचे पोषण योग्य होते. ऊस वाढे मुरघास वापरल्यास जनावराचा गाभ पाडतो, हा गैरसमज आहे. मुरघास तयार करताना culture संप्रेरके वापरली तर, त्यामुळे ऊस वाढ्यातील oxlic acid चे ब्रेक डाऊन होऊ शकते. मात्र ऊसाचे वाढे मूरघासासाठी वापरतांना प्रती जनावर १०० ग्रॅम चांगल्या गुणवत्तेचे मिनरल मिक्चर दररोज द्यावे. तरच जनावराची तब्बेत चांगली राहील.

६) मुरघास वर्षभर वापरला तर चालतो का?
उत्तर: होय तुम्ही पूर्ण वर्षभर मुरघास वापरू शकता.

७) स्टड फार्म (घोडे) साठी मुरघास वापरता येतो का?
उत्तर: होय घोड्यांसाठी मुरघास वापरता येतो.

## मुरघास वापरल्याने होणारे फायदे:

१) वर्षभर उच्च प्रतीच्या चाऱ्याची उपलब्धता.
२) दुग्ध उत्पादनात २ ते ३ लिटर वाढ.
३) जनावरांची प्रजनन क्षमता वृद्धी (गायी वेळेवर माजावर येऊन गाभण राहतात).
४) पारंपरिक चाऱ्यापेक्षा सकस आहार.
५) वाजवी किंमत व चाऱ्याचा कमी अपव्यय एकूण चारा खर्चात ५०% बचत.
६) सोपी उत्पादन पद्धती मशीनचा वापर केल्याने मजुरीत बचत
७) ८ ते ९ % प्रथिने
८) ३५% ड्राय मॅटर मुळे दुधातील फॅट, SNF मधे वाढ.
९)एकाच वेळी ७५ ते ८० दिवसांत मका चिकाच्या अवस्थेत असताना चारा कापणी केली जाते.
१०) रिकामी झालेली जमीन दुसऱ्या पिकासाठी त्वरित उपलब्ध होते.

(संपर्क: +९१ ८६००१८०६४४)

★ ★ ★